नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०६/२०२४ (गुरूवार) दुपार

## पो.स्टे. काटोल हद्दीत जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १२/०६/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, झिल्पा शिवारात पियुष पेठे च्या शेताजवळील पांदन रस्त्यामध्ये काही इसम ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे काटोल हद्दीत झिल्पा शिवारातील पियुष पेठे याच्या शेताजवळील पांदन रस्त्यामध्ये रेड केली असता काही इसम हे ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळताना दिसुन आले. त्यामध्ये **आरोपी नामे— १) बबन नत्थुजी दुधकवळे वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. २ झिल्पा २) गणपत नत्थुजी बोरीवार वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ झिल्पा ३) सिध्दार्थ रमेश चोरधडे वय २३ वर्ष, रा. बोरी काटोल ४) मंगेश च्रदशेखर मोहोड, वय ३७ वर्ष, रा. झिल्पा ५) सुरज गणेश सोनेकर, वय २७ वर्ष, रा. झिल्पा ६) संदिप रामदास मोरे, वय ३० वर्ष रा. झिल्पा ७) फरार आरोपी सचिन प्रभाकर मोहोड, रा. झिल्पा ८) फरार आरोपी स्वप्नील राजु बावणे रा. झिल्पा** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन १) स्प्लेन्डर मो. सा. क्र. एम.एच. ४०/बि टी ००२१ किंमती ३०,००० /— रूपये २) ड्रिमयुगा मो. सा. क्र. एम.एच. ४०/बि. एस ४९१० किंमती ३०,०००/— रूपये ३) स्प्लेन्डर मो. सा. क्र. एम.एच. ४०/सी. एफ. ६७०१ किंमती ३५,०००/— रूपये ४) नगदी १३५० असा एकुण ९६३५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, पोना विकास वाईलकर, पोशि बबन बन्सुले यांनी केली.

## पो.स्टे. रामटेक हद्दीमधील क्रिकेट सट्टयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दि. १२/०६/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोस्टे कन्हान परीसरात अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना इंडिया विरुद्ध अमेरिका क्रिकेट मॅच असल्याने पो.स्टे. कन्हान हद्दीत मॅचवर बेटिंग करणाऱ्याचा शोध घेत असता मुखबीर द्वारे खबर मिळाली कन्हान येथे राहणारा शाकीर व. शफीक शेख वय ४१ वर्ष रा. मनसर हा मनसर रामटेक येथे बसून क्रिकेट मॅचवर जुगार खेळवीत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने आरोपीस मनसर येथील चीचखेडे ले आउट येथून त्याला ताब्यात घेवून त्याचे दोन्ही मोबाईल चेक केले असता मोबाईल मध्ये मॅचवर लावलेले पैशाचे सौदे तसेच क्रिकेट बेटिंग करीता उपयोगात येणारी Silvarbet ns४४२२१ या नावाची ID मिळून आली त्याला याबाबत विचारले असता त्याने सांगितले की मी क्रिकेट मॅचवर जुगार खेळवीतो व ही ID मला माझा भाऊ जाबिर बब्बू शेख रा. सावनेर याने दिली आहे व त्यांचे सांगणे वरुन मी जुगार खेळवितो असे सांगितले. यावरून त्याला ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन २ मोबाईल व क्रिकेट बेटिंगचे साहित्य एकूण किंमती ३०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे रामटेक येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम, सहकलम १०९ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, PSI बट्टूलाल पांडे ASI नाना राऊत, HC विनोद काळे, ईकबाल शेख, NPC संजय बरोदीया, pc अभिषेक देशमुख चालक Hc मोनू शुक्ला यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर